भारतीय सौर २ चैत्र १९४०
अमरावती,शुक्रवार २३ मार्च २०१८

www.dainikhindusthan.com
हिंदुस्थान

सराफा बाजार
सोने १० ग्रॅम ३१,९००.००
चांदी किलो ४०,०००.००

मुद्रा बाजार
अमेरिकन डॉलर ६५.२९ रुपये

शेअर बाजार
बीएसई ३३००६.२७
निफ्टी १०,११४.७५

# ॲड.सुनील गजभियेचे न्यायालयात आत्मसमर्पण

## गाडगेनगर पोलीसांनी घेतले ताब्यात : पोलीस आयुक्तांपुढे पेशी

अमरावती,दि.२१ : शितल पाटील हत्याकांडातील पसार आरोपी ॲड. सुनील गजभिये याने आज नाट्यमयरित्या जिल्हा न्यायालयात आत्मसमर्पण केले. यानंतर न्यायालयाने आरोपीस गाडगेनगर पोलीसांना ताब्यात घेण्याचे आदेश दिले. गजभिये याची पोलीस आयुक्त दत्तात्रय मंडलीक यांच्यापुढे पेशी देखील करण्यात आली. गजभियेच्या आत्मसमर्पणानंतर न्यायालयात चांगलीच गर्दी झाली होती.

शितल पाटील हत्याकांड १६ तारखेला उघडकीस आल्यानंतर पोलीसांना चकविणाऱ्या सुनील गजभिये याने आज गुरुवारी न्यायालयात आत्मसर्पण केले. सकाळी अकरा वाजताचे सुमारास तो तिसऱ्या माळ्यावरील मुख्य न्यायदंडाधिकारी कोठारी यांच्या न्यायालयात हजर झाला. यावेळी न्यायाधीश देखील न्यायालयात उपस्थित नव्हते. गाडगेनगर पोलीसांना गजभियेच्या आत्मसमर्पणाची माहीती मिळताच ते तातडीने न्यायालयात पोहोचले. परंतु न्यायालय परिसरातून त्याला ताब्यात घेणे शक्य नव्हते. न्यायालयाचे कामकाज सुरु झाल्यानंतर सुरुवातीला इतर प्रकरणांची सुनावणी झाली. यानंतर शितल पाटील हत्याकांडातील पसार आरोपी सुनील गजभियेबाबतची पहिली खबर पोलीसांनी न्यायाधीशांपुढे सादर केली. गजभिये यांचे वकीलपत्र ॲड. बाळासाहेब गंधे यांनी घेतले होते. दुपारी एक वाजताचे सुमारास गजभिये यास पोलीसांच्या ताब्यात देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. आपला चेहरा दिसू नये यासाठी गजभिये याने तोंडाला (उर्वरित पान २ वर)



ॲड. सुनील गजभिये याला न्यायालयातून नेतांना गाडगेनगर पोलीस.



शितल पाटील हत्याकांड

### शितल पाटील सोबतच्या वादाची कबूली

पोलीस आयुक्तांसमोर पेशी दरम्यान आरोपी सुनील गजभिये याने शितल पाटील हीच्यासोबत आपला गत दीड वर्षापासून वाद सुरु असल्याची कबूली पदिली. गत १३ तारखेला शितल पाटील हीच्यासोबत आपण व रहेमत पठाण असल्याचेही त्याने सांगितले. १३ तारखेच्या मध्यरात्री अथवा पहाटे तिचा मृत्यु झाल्याचे शवविच्छेदनात म्हटल्या गेल्याचे पोलीसांनी यापूर्वीच सांगितले आहे. आयुक्तांपुढे त्याने शितल पाटील हीच्यासोबतच्या संबंधाची माहीती दिली. गत चार वर्षापासून तिच्यासोबत ओळख होती ,असेही तो म्हणाल्याचे पोलीस आयुक्तांनी प्रसारमाध्यमांशी बोलतांना स्पष्ट केले.

### पोलीसांवर अपयशावर ठपका

सलग सहा दिवस पोलीसांना हुलकावणी देणाऱ्या ॲड. सुनील गजभिये याने गुरुवारी न्यायालयापुढे आत्मसमर्पण केल्याने पोलीसांवर अपयशाचा ठपका बसल्याची चर्चा न्यायालय परिसरात सुरु होती. गजभिये व रहेमत पठाण यांना पकडण्यासाठी चार पथके गठीत करण्यात येवूनही गाडगेनगर पोलीस व गुन्हे शाखेला त्यास पकडता आले नाही.

# अध्यक्ष पदासाठी कोल्हटकर व तिवारीमध्ये लढत

## ॲड. प्रशांत देशपांडे व ॲड. नंदकिशोर कलंत्रीचा उमेदवारी अर्ज मागे

अमरावती,दि.२० : अमरावती जिल्हा वकील संघाच्या अध्यक्ष पदाच्या निवडणूकीसाठी केवळ ॲड. नितीन कोल्हटकर व ॲड. ब्रिजेश तिवारी रिंगणात राहीले आहेत. वर्तमान अध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे व ॲड. नंदकिशोर कलंत्री यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज आज गुरुवारी मागे घेतला.

अमरावती जिल्हा वकील संघाची निवडणूक येत्या २६ तारखेला होत आहे. कार्यकारीणीतील सात सदस्य व ग्रंथालय सचिवाची अविरोध निवड झाली आहे. उर्वरित अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव पदासाठी उमेदवार रिंगणात आहेत. अध्यक्ष पदासाठी वर्तमान अध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे यांचेसह माजी अध्यक्ष ॲड. नंदकिशोर कलंत्री, ॲड. नितीन कोल्हटकर व ॲड. ब्रिजेश तिवारी रिंगणात होते. परंतु आज शुक्रवारी ॲड. प्रशांत देशपांडे व ॲड. नंदकिशोर कलंत्री यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज आज मागे घेतला. यामुळे २६ तारखेला अध्यक्ष पदासाठी ॲड. नितीन कोल्हटकर व ॲड. ब्रिजेश तिवारी यांच्यात लढत होणार आहे. उपाध्यक्ष (उर्वरित पान २ वर)

# समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त निलंबित

## आश्रमशाळेतील हलक्या दर्जाचे खाद्य तेलाचे प्रकरण
## आ. डॉ. सुनील देशमुख यांच्या लक्षवेधीवर कारवाई



मुंबई दि.२२ : धारणी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय वस्तीगृहातील तेल खरेदीच्या घोटाळा प्रकरणी समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त डी.आर.वडकुते व सह आयुक्त श्रीमती इंगळे यांना निलंबित करण्यात आले आले आहे. आमदार डॉ. सुनील देशमुख यांच्या विधानसभेत लक्षवेधीवरून राज्य शासनाने ही कारवाई केली आहे.

धारणी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय वस्तीगृहातील विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात येणाऱ्या भोजनात निकृष्ट दर्जाच्या तेलाचा वापर केल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. यानंतर स्थानीक अन्न व औषधी प्रशासन विभागाद्वारा येथील (पान २ वर)

# १ तारखेपासुन राजापेठ रेल्वे फाटक होणार बंद

## पोलीस आयुक्तांनी जारी केली अधिसूचना

अमरावती,दि.२० : राजापेठ रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकामामुळे राजापेठ रेल्वे फाटकामधून होणारी वाहतुक येत्या १ तारखेपासून बंद करण्यात येणार आहे. पोलीस आयुक्त दत्तात्रय मंडलीक यांनी यासंबंधीची अधिसूचना आज जारी केली आहे.

अधिसूचना सांगण्यात आले आहे की, महापालिकेचे शहर अभियंता यांनी यापूर्वी सुद्धा रेल्वे फाटक बंद करण्याची व वाहतुक वळविण्याची परवानगी मागितली होती. त्यानुसार २० डिसेंबर २०१७ रोज व २३ जानेवारी रोजी ीकंत्राटार, महापालिका अधिकारी, रेल्वे विभागाचे अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक व लाकेप्रतिनिधींची बैठक घेण्यात आली होती. यावेळी लोकप्रतिनिधींनी राजापेठ चौकाजवळ नागरिकांना रेल्वे विभागाने पर्यायी व्यवस्था केल्यानंतर रेल्वे फाटक बंद करण्याचे मत व्यक्त केले होते. त्यावर रेल्वे विभागाने पर्यायी व्यवस्था करणे शक्य नसल्याचे नुकतेच महापालिका (पान २ वर)

# दांपत्याचा शिक्षणाधिकाऱ्यांसमोर आत्महत्येचा प्रयत्न

## आरटीई अंतर्गत प्रवेश नाकारल्यावरून घडला प्रकार : पोलीसांच्या सतर्कतेने टळला अनर्थ

अमरावती,दि.२२ : आरटीई अंतर्गत विद्यार्थी प्रवेशास पात्र ठरून देखील रजीष्टार कार्यालयातून घरभाडे करारनाम्याच्या अटीवर शाळांनी प्रवेश नाकारल्याने संतप्त झालेल्या दांपत्यांने आज गुरुवारी प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांसमोर आत्महत्येचा प्रयत्न केला. अंगावर रॉकेल ओतण्याचा प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आई वडीलांना वेळीच शांत करण्यात आल्याने अनर्थ टळला. या गंभीर प्रकारामुळे भाड्याच्या घरात राहणाऱ्या पालक व त्यांच्या विद्यार्थ्यांच्या भविष्याचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सध्या प्राथमिक प्रवेशासाठी प्रक्रिया सुरु आहे. परंतु स्वत:चे घर नसल्याने भाड्याच्या घरात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेशाचा पेच वाढला आहे. अशा पाल्यांना उपनिबंधक कार्यालयात घरभाडे करारनामे करण्यात यावे व त्याची प्रत सादर करण्याची अट शाळांनी घातली आहे. त्यामुळे आरटीईमध्ये नाव असतांनाही अनेक शाळा भाड्याच्या घरात राहणाऱ्या पाल्यांचा प्रवेश नाकारत आहे. या प्रकाराविरोधात युवा स्वाभिमानी संघटनेच्या वतीने गेल्या दोन दिवसापासून आंदोलन करण्यात येत आहे. याच अंतर्गत आज युवा स्वाभिमानीचे कार्यकर्ते शेकडो पालकांसह प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात डेरेदाखल झाले होते. नोटरी व स्टॅम पेपरवरील करारनाम्यावर प्रवेश निश्चित करण्याची मागणी त्यांनी लावून धरली. परंतु शिक्षण विभागार रजीष्टार करारनाम्यावर कायम होता. शिक्षणाधिकारी राम तुरणकर शासन निर्देशाची माहीती दिली. उपनिबंधक कार्यालयाद्वारे करारनामा करणे शक्य नसल्याने आता पाल्याचा प्रवेश होणार नाही, यामुळे अनेक पालक चिंतातुर झाले होते. याच पालकांपैकी एक राहुल व राधा कलाने यांनी शिक्षणाधिकारी राम तुरणकर यांच्यासमोर सोबत आणलेली रॉकेल ओतले. परंतु उपस्थित पोलीस व आंदोलकांनी त्यांच्याजवळील रॉकेलची बॉटल ताब्यात घेतले. वेळीच त्यांना रोखण्यात आल्याने पुढील अप्रिय घटना टळली. शेवटी अतिरिक्त सीईओ विनय ठमके व पोलीसांनी मध्यस्थी केल्याने पालकवर्ग शांत झाले. यावेळी युवा स्वाभिमानी संघटनेचे अनुप अग्रवाल, संगीता जाधव, वंदना मंडलीक, नंदीनी शिंदे आदींसह शेकडो पालक उपस्थित होते. दरम्यान, आरटीईअंतर्गत पहिल्या टप्प्यातील प्रवेशासाठी २३ तारखेपर्यत शेवटची मुदत देण्यात आली होती. यामुळे ज्यांनी प्रवेश निश्चित केले त्यांचे प्रवेश आपोआप रद्द होण्याची सूचना जारी करण्यात आली होती. परंतु भाडेकराराच्या अटीवर युवा स्वाभिमानी व पालक चांगले आक्रमक झाले आहेत. यामुळे पहिल्या टप्प्यातील प्रवेशाकरिता अंतिम मुदत २७ तारीख करण्यात आली आहे.



अंगावर रॉकेल ओतून आत्महत्येचा प्रयत्न करतांना राहुल कलाने तर दुसऱ्या छायाचित्रात पाल्यास प्रवेश मिळण्याची शक्यता धुसूर झाल्याने शिक्षणाधिकाऱ्यांसमोर आपली व्यथा मांडतांना राधा कलाने

### शासनाला प्रस्ताव पाठविणार

पालकांचा जाचक अट ठरलेला रजीष्टार कार्यालयातील घरभाडे कराराची अट शिथिल करण्यासाठी शासनाकडे तश्या स्वरूपाचा प्रस्ताव पाठविण्यात येणर असल्याचे अतिरिक्त सीईओ ठमके यांनी आज पालकांना सांगितले. हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर परिणाम करणारी ही अट शासनाने चार दिवसात शिथील न केल्यास अनेक विद्यार्थी प्रवेशपासून वंचित राहण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे.

























